# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३७७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०२/०७/२०१६.

**१) इंडस टॉवरच्या थ्रिडर केबलची चोरी. :—**

दिनांक ०१+०२/०७/०१६ रोजी २०.०० ते ०६.०० वा. दरम्यान अज्ञात चोराने जाभंडी शेतशिवार येथील इडंस टॉवर क्र. ११३२३२९ यातील थ्रिडर केबल काळया रंगाचा ८ नग प्रत्येकी २५ मीटरचे एकुण २०० मीटर कि. ६०००/—रू. चा माल कापुन चोरून नेला. असे फिर्यादी भरत वसंराव गडकरी वय २९ वर्ष रा. आदर्श कॉलोनी रेल्वेस्टेशन जवळ नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. मडावी पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) मुलीचा विनयभंग व बदनामी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिड वर्षा पासुन ते दि. ०१/०७/०१६ पर्यंत फिर्यादी वय २३ वर्ष, ही रोज तिच्या गावावरून नर्सीगहोम मध्ये डयुटीला नेहमी प्रमाणे जातांना आरोपी याने फिर्यादीला म्हटले की, ''मला तुझ्या सोबत मैत्री करायची आहे. '' असे म्हणुन वेगवेगळया पध्द्तीने बोलण्याचा प्रयत्न केला व फिर्यादीचे आरोपी सोबत प्रेम संबध आहे अशी बदनामी केली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३५४(ड)(१)(२),५०० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. ढाकणे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. सदर गुन्हयातील आरोपीला अटक करण्यात आली.

**३) इसमाचे प्रेत मृत अवस्थेत मिळुन आले. :—**

दिनांक ०२/०७/०१६ रोजी ७.३० वा. दरम्यान अनोळखी मुतक इसम वय अदांजे ३५ वर्ष हा आबांडी येथे मृत अवस्थेत मिळुन आला. असे फिर्यादी लक्ष्मण फुकटुजी बावनकर वय ४५ वर्ष रा. आंबाडी (पोलीस पाटील) यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी पोहवा. बाहादुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत. चौकशी दरम्यान सदर इसम शिवाजी बापा वरकर वय ३५ वर्ष, रा. मकरधोकडा पो.स्टे. उमरेड जि. नागपुर हा असल्याची ओळख पटली.

**४) अवैध दारू अडयांवर धाडी. :—**

दिनांक ०२/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. आधंळगाव व पवनी येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी दारू कि. ५००/—रू. व ०९ लिटर ५४० मिली. देशी दारू कि. २६५०/—रू. असा एकुण कि. ३१५०/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.